# २१. संसदीय राजकारणाच्या चक्रव्यूहात अडकलेली मातंग चळवळ

**राहुल नरंगलकर**
सा. प्राध्यापक, राज्यशास्त्र अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.

महाराष्ट्रात अनुसूचित जाती संवर्गात असलेल्या ५९ जातींमध्ये संख्यात्मकदृष्ट्या महार/ नवबौद्ध, मातंग आणि चांभार या प्रमुख अग्रगण्य जाती आहेत. या जाती सवर्ण जातींकडून केल्या जाणाऱ्या शोषणात्याचाराच्या समान बळी असल्यातरी जातवर्णव्यवस्थेच्या विषमताजन्य मुल्य चौकटीच्या वाहक असल्याने त्या परस्पर व्यवहारात सामंजस्य प्रस्थापित करू शकल्या नाहीत. त्यामुळे त्या एकत्रितपणे व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीमध्ये किंवा संसदीय राजकारणात सहभागी होताना दिसत नाहीत.स्वातंत्र्यपूर्वकाळात या प्रमुख जातींना एकत्रित करण्यासाठी महात्मा फुले, वि.रा. शिंदे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या परिश्रमपूर्वक प्रयत्नांना व्यापक यश मिळू शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीत आणि स्वातंत्र्योत्तर काळात संविधानिक तरतुदीच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या सर्व प्रकारच्या संधीं / सवलतींचा स्वजातीला अधिकाधिक लाभ मिळवून देण्याच्या अभिलासेपोटी या जाती सामुहिक एकजुटीऐवजी प्रस्थापित सवर्ण जातींच्या आधाराने प्रवाहित झाल्या. ‘अनुसूचित जाती’ अशी राज्यव्यवस्थेने दिलेली नवी सामुहिक ओळख परिदृढ करण्याऐवजी इथल्या वर्णजात व्यवस्थेने दिलेली मूळ ओळख अधोरेखित करून (पुढे आणून) संसदीय राजकारणात सक्रीय झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष अशी दलित आणि दलितेत्तर शोषितांची व्यापक ओळख निर्माण करू शकणाऱ्या राजकीय व्यासपीठांची निर्मिती केली.[१] परंतु प्रत्यक्ष व्यवहारात अशी ओळख प्रस्थापित होऊ शकली नाही. डॉ.आंबेडकरांच्या पश्चात त्यांच्या वारशावर हक्क सांगणाऱ्या तथाकथित अनुयायांनी सर्व दलितांची सामुहिक ओळख दृढ होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली नीती प्रामाणिकपणे अंगिकारली नाही. म्हणून संसदीय राजकारण आणि प्रशासनात प्रस्थापित असलेल्या धुरीण जातींना या सुट्या-सुट्या स्वरुपात प्रवाहित झालेल्या दलित जातींचा आपल्या सोयीप्रमाणे आणि प्रसंगानुरूप वापर करून घेता आला. त्यामुळे कमकुवत आणि दुर्बल दलित जाती संसदीय राजकारणाच्या परिघात आत्मविश्वासाने वावरु शकल्या नाहीत. अनुसूचित जाती संवर्गात संख्यात्मकदृष्ट्या दुसऱ्या स्थानावर परंतु महार / नवबौद्ध आणि चांभार जातीच्या तुलनेत संसाधनाच्यादृष्टीने कुमकुवत व दुर्बल असलेल्या मातंग जातीचा संसदीय राजकारणातील प्रारंभीपासूनचा वावर आश्रित स्वरूपाचा राहिल्याने तो कधीच दखलपात्र ठरू शकला नाही. मातंग जातीची सार्वजनिक जीवन व्यवहारातील भूमिका स्वहिताऐवजी प्रस्थापित व्यवस्थेची निष्ठा वाहणारी असल्याने तिला संसदीय राजकारणाचा चक्रव्युह भेदता आलेला नाही.

**काँग्रेस ते हिंदुत्ववादी पक्षापर्यंतचा मातंगांचा प्रवास**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३७ च्या प्रांतीय निवडणुकीत मुंबई प्रांतात अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या पंधरा राखीव जागांपैकी कांही जागा मातंगांना देण्याचे आश्वासन दिले होते.[२] त्यानूसार उमेरवारीसाठी अर्ज केलेल्या कृष्णाजी महादेव काळोखे या एकमेव मातंग उमेदवारास एका जागेवर स्वतंत्र मजूर पक्षाची उमेदवारी दिली गेली. या निवडणुकीत मातंग समुदाय प्रामाणिकपणे ‘स्वमप’ सोबत राहिला. या निवडणुकीत तिकीट नाकारलेल्या अनेक महार पुढाऱ्यांनी बाबासाहेबाची संगत सोडली आणि ते काँग्रेसच्या कळपात सामील होऊन राष्ट्रीय हरिजनाचे मेळावे भरवू लागले.[३] रणखांब्यासारख्यानी बाबासाहेबाविरुद्ध कडवट व भडक प्रचारासाठी पैसा पुरविला.[४] माटे-भोपटकरासोबत राहून सतत आंबेडकर विरोध जोपासणारे सकट-वायदंडे हे मातंग पुढारी या निवडणुकीत भोपटकरांच्या ‘लोकशाही स्वराज्य’ पक्षाने ‘स्वमप’शी हातमिळवणी केल्याने[५] आंबेडकरांच्या म्हणजेच ‘स्वमप’च्या विरोधात प्रचार करतांना आढळले नाहीत. पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील सीताराम बाबाजी लांडगे, सखाराम बाळाजी

भिंगारदिवे, शंकराव साठे (माळीवाडा), केरू रामचंद्र जाधव आणि त्यांचे सहकारी 'स्वमप' च्या प्रचारात हिरीरीने सहभागी झाले.[६] डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत महार/ नवबौद्धप्रमाणे संपूर्ण मातंग समाज सामील झालेला नसलातरी कांही व्यक्तिंचे योगदान निश्चितच मोठे होते. त्यांना बाबासाहेबांनी योग्य स्थानही दिले होते. परंतु बाबासाहेबांच्या पश्चात त्यांची वाताहत झाली.[७] पुढे 'भारिप'मध्ये सुरु झालेल्या महार/ नवबौद्धांच्या लाथाळ्यात महारेत्तरांना वाव मिळण्याची शक्यता धूसर बनली होती. 'भारिप'मध्ये नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता मावळल्याने मातंग समुदाय काँग्रेसच्या सरंजामी कळपात सामील झाला.[८] कॉ. अण्णा भाऊ साठे यांची कम्युनिस्ट पक्षातील सक्रियता जात विरहीत व्यक्तिगत स्वरुपाची होती. त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली मातंग समुदायाला कम्युनिस्ट पक्षात एकत्रित केल्याचे आढळत नाही. कारण कम्युनिस्टांच्या पक्षबाधंणीचा पाया जातीऐवजी वर्गाधारीत होता. तसेच कम्युनिस्टांनी महाराष्ट्रात पुरतेतरी आपले कार्यक्षेत्र शहरी ओद्योगिक क्षेत्रातील कामगार वर्गापुरते सीमित ठेवल्याने ग्रामीण भागात विखुरलेला आणि गावगाड्यात बंधिस्त असलेला मातंग समुदाय कम्युनिस्ट पक्षात सहज सक्रीय होणे अशक्य होते. कॉ. अण्णा भाऊ साठे यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या निर्मितीच्या राजकारणात अधिक उठावदारपणे पुढे आलेली सक्रियता संसदीय राजकारणाच्या परिघात शिरकाव करण्याच्या महत्वाकांक्षेत रुपांतरीत झाली नाही. त्यामुळे कॉ. अण्णा भाऊ साठे त्या भूमिकेतून आपल्या भौवती मातंग समुदायाचे जनसंघटन उभारण्याच्या कार्याला वाहून घेतल्याचे आढळत नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेस मातंग जातीला आपल्याकडे वळविण्यात यशस्वी झाली.

चांभारांना १९३७ च्या आणि मातंगांना १९४६ च्या निवडणुकीपासून आपल्याकडे आकर्षित करून घेणाऱ्या काँग्रेसने जेथे जेथे शक्य असेल तिथे तिथे चांभार व महार जातीच्या एकेकाळच्या बाबासाहेबाच्या सहकाऱ्यांना तिकिटे त्यांना नामोहरण करण्याची एकही संधी सोडली नाही. त्यात ती यशस्वी झाली. काँग्रेस नियंत्रित हरिजन सेवक संघात आणि काँग्रेस पक्षात मातंग समुदायाचे के. एल. मोरे, तात्यासाहेब भिंगारदिवे, बाबुराव भारस्कर आणि देवराम कांबळे आदि पुढारी सक्रीय झाले. काँग्रेसने प्रथम 'शेकाफे' आणि नंतर 'भारिप'च्या दलित राजकारणाला वेसन घालण्याच्या उद्देशाने मातंग आणि चांभारांना गोंजारले. त्यांना राखीव जागेवरील आमदारकी,खासदारकी आणि मंत्रीपदे मिळवून देण्याबरोबर हरिजन सेवक संघाच्या नियंत्रणाखाली दलित वर्ग संघाच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेले विद्यार्थी वसतिगृह चालविण्याची संधी उपलब्ध करून दिली. या संधीचा कल्पकपणे वापर करून काही मोजक्या मातंग पुढाऱ्यांनी आणि त्यांच्या अवतीभौवती वावरणाऱ्या कार्यकर्त्यांनी शाळा-महाविद्यालयाचे संस्थात्मक जाळे आपापल्या परिसरात वाढवून मातंग समाजात शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. या कार्यात मधुकारव घाटे हे अग्रभागी तर त्या खालोखाल जयवंतराव आवळे याचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे.[८] प्रदिर्घकाळ महाराष्ट्राला मातंगांचा तथाकथित पुढारी असल्याचे भासवणाऱ्या परंतू प्रत्यक्षात होलार असल्याचा आरोप ज्यांच्यावर केला जातो असे लक्ष्मणराव ढोबळे महाराष्ट्राच्या राजकारणाचे धुरिणत्व असणाऱ्या प्रस्थापित नेत्यांना लाजवेल असा आपल्या शैक्षणिक संस्थांचा अवाढव्य विस्तार करण्यात यशस्वी झाले.[९] दुर्दैवाने त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये मातंगांचा टक्का मात्र फारसा सापडत नाही किंवा या शैक्षणिक संस्थांचा मातंगांच्या विद्यार्थ्यांना फारसा लाभ मिळत नाही. अशी त्यांच्यावर टिका केली जाताना दिसते.

काँग्रेस मधील चांभार-ढोर जातीचे नेतृत्व पक्ष वर्तुळातील, आणि राज्य वा केंद्रीय मंत्रिमंडळातील महत्वाची पदे कल्पकपणे हस्तगत करण्यात जसे यशस्वी झाले तशी कल्पकता मातंग पुढाऱ्यांना साधता आली नाही. १९६७ नंतर महार/ नवबौध्द जातीसमुदायाने काँग्रेसशी भारिपच्या एका गटामार्फत युती केली. काहींजन प्रत्यक्ष काँग्रेसमध्ये सामील झाले.[१०] त्यामुळे मातंग व चांभारांचे काँग्रेस मधील आस्तित्व डळमळीत झाले. १९७७ ते १९९८ असे सात वेळा खासदारकीची संधी मिळालेल्या संदिपान थोरातांना विधिमंडळात अथवा समाजकारणात असे कुठेही आपले कर्तुत्व सिद्ध करता आले नाही. त्यांचा मौनी खासदार असा उल्लेख केला जात असे. त्यामुळे मातंगांना त्यांच्या खासदारकीच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा लाभ मिळाला नाही. काँग्रेसमधील मातंग पुढाऱ्यांच्या कर्तृत्वापेक्षा सामाजिक कार्यकर्ते मातंग समुदायासाठी अधिक फलदायी ठरले. बाबासाहेब गोपले यांच्या प्रदिर्घ संघर्षामुळे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे विभाजन करून मातंग समुदायासाठी स्वतंत्र अशा लोकशाहीर

अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची तसेच क्रांतींवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाची स्थापना काँग्रेस सरकारला करावी लागली.[११] काँग्रेसने मातंग समाजातील काही ठराविक पुढाऱ्यांनाच हाताशी धरले. त्यामुळे नेतृत्वाची अभिलाशा बाळगून नव्याने राजकारणाच्या परिघात प्रवेश करण्यासाठी धडपडणाऱ्या मातंगांच्या तरुण कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये अवकाश मिळू शकला नाही. मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रमही काँग्रेस देऊ शकली नाही. परिणामी काँग्रेस या समुदायाचा प्रामाणिक निष्ठावान मतदार (केवळ व्होट बँकेसाठी) म्हणून वापर करीत असल्याची भावना तरुण कार्यकर्त्यात निर्माण झाली.

दरम्यानच्या कालखंडात अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी हिंदु दलितांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरु केले होते. राखीव जागांचा फायदा केवळ महार/नवबौद्ध जातीलाच मिळतो, हिदू दलितांना त्याचा लाभ मिळत नाही. असा प्रचारही त्यांच्याकडून केला गेला. काँग्रेसपासून दूखावले गेलेले, रिपब्लिकन धोरणांमुळे निराश झालेले तरुण शिवसेना-भाजप युतीकडे आकर्षित झाले. १९९० आणि १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीने मातंग आणि चांभार-ढोर या जातींना काँग्रेसनेच्या तुलनेत अधिक उमेदवारी दिली. १९९५ च्या महाराष्ट्रात झालेल्या सत्तातंरात मातंग, चर्मकारांनी महत्वाचा वाटा उचलला. १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या एकूण १८ जागांपैकी १२ जागा भाजप - शिवसेना युतीने जिंकल्या. त्या १२ पैकी ९ उमेदवार हे महारेत्तर होते. बारा सदस्यांमध्ये पाच चांभार-ढोर, एक मेहत्तर, तीन महार आणि तीन मातंग सदस्य होते.[१२] युतीच्या मंत्रीमंडळात (बबनराव घोलप)चांभार जातीला कॅबिनेट तर मातंग जातीला (दिलिप कांबळे) राज्यमंत्रीपद मिळाले. भाजप-सेनेमार्फत सत्तेत स्थान मिळाल्याने हा समाज त्या पक्षांकडे मोठया प्रमाणात वळला. जनता दल व इतर पुरोगामी पक्षातील मातंग नेत्यांनी पक्षांतर करुन भाजप-सेनेत प्रवेश केला. सेना-भाजपने या मातंग समुदायास खूप महत्वाची अधिकारपदे दिलीत असे नाही. काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात संधी मिळूनही मातंग पुढाऱ्यांना जसे आपले प्रभावक्षेत्र रुंदावता आले नाही तशीच स्थिती मातंग नेत्यांची सेना-भाजपमध्ये झाली. मातंगांच्या तुलनेत चर्मकार आपला शिवसेनेतला पाया विस्तारित व मजबूत करण्यात यशस्वी झाले. सेना-भाजपला आपला सामाजिक आधार वाढवण्यासाठी मातंग व चर्मकार समुदायाचा निश्चितच उपायोग झाला. याचा एक परिणाम असाही झाला की, मातंग - चर्मकमारांना सेना-भाजपच्यामाध्यमातून राजकीय अधिकारपदे मिळाल्याने रिपब्लिकन कार्यकर्त्यात या समुदायाबद्दलच्या द्वेश भावनेत वाढ झाली. याचे प्रतिबिंब जयदेव गायकवाड या अभ्यासू राजकारणी पुढाऱ्याने आपल्या 'जातीभेदाचे अंत:प्रवाह' या ग्रंथात वस्तुस्थितीचा विपर्यास करून केलेल्या युक्तिवादात दिसते. ते लिहतात "१९९५ ला सेना-भाजपातून निवडून आलेले सर्व आमदार मातंग व चर्मकार होते. यात एकही बौध्द नव्हता. बौध्द तथा आंबेडकरवाद्यांनी सेना-भाजपाला मते दिली नाहीत. कारण बौध्द सेना-भाजपाला जातीवादी पक्ष मानतात व बौध्द जातीवादी पक्षाला मते देत नाहीत.''[१३]

सोलापुर जिल्हयातील माळशिरस आणि मोहळ या अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या आणि मातंगांचे प्रभावक्षेत्र असलेल्या मतदार संघात धनगर समाजाची लोकसंख्या दखलपात्र आहे. धनगर जातीचे उत्तमराव जानकर (माळशिरस) आणि नागनाथ क्षीरसागर हे हिंदू-खाटिक जातीची जात प्रमाणपत्रे मिळवुन अपक्ष म्हणून सातत्याने निवडणूक लढवित असतात. ते प्रत्येक निवडणुकीत पराभूत झाले असले तरी नेहमी त्यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत.[१४] त्याचा मातंगाच्या प्रतिनिधित्वावर अनिष्ठ परिणाम झाला आहे.

महार/नवबौध्दांनी २००९ सार्वत्रिक निवडणूकीपासून सर्वच राजकीय पक्षामार्फत सत्ता वर्तुळात शिरकाव करण्याची नीती अंगिकारल्याने मातंग जातीची सर्वत्र कोंडी झालेली आढळली. चांभार-ढोर आपल्या आर्थिक प्रबळतेचा व सवर्णजातींशी असलेल्या जवळीकतेचा वापर करून महार/नवबौध्दाच्या नीतीवर मात करू शकले; परंतु आर्थिक दुर्बलता, राजकीय सजगतेचा अभाव आणि विस्कळित जात संघटन यामुळे मातंग जात या निवडणूकीत चाचपडताना दिसली. या निवडणूकीचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे मतदारसंघ पुनर्रचनेमूळे महाराष्ट्राच्या राजकारणातील मराठा सरंजामदाराचे मतदार संघ आरक्षित झाले. या सरंजामदारांनी अनुसुचित जातीतील आपले निष्ठावान उमेदवार निवडून आणून त्या मतदार संघाचा कारभार स्वत:कडेच अबाधित ठेवण्यात यश मिळविले.[१५] उदाहरणात विजयसिंह मोहिते पाटील (माळशिरस) रामराजे निंबाळकर (फलटण), राजन पाटील (मोहोळ) भास्करराव पाटील

खतगावकर (देगलुर-बिलोली), आणि रविंद्र गायकवाड (उमरगा) इत्यादी. प्रस्थापितांच्या मतदार संघातुन निवडून आलेले त्यांचे अनुसुचित जातीतील निष्ठावान आपल्याच मतदार संघात मात्र नामधारी प्रतिनिधी बनल्याचे दिसून येतत. ७३ व्या आणि ७४ व्या संविधान विशोधनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानिक दर्जा देऊन त्यात अनुसुचित जाती-जमाती, ओबीसी आणि सर्व संवर्गातील स्त्रीया यांना प्रतिनिधित्वाबरोबर सतापदे मिळवून देण्यासाठी आरक्षण नीती लागु केल्याने सतापदे प्राप्त मागासवर्गीय प्रतिनिधी व स्त्रींया जसे नामधारी सत्ताधारी बनले तशीच स्थीती आरक्षित मतदार संघातुन प्रस्थापिताच्या आशीर्वादाने निवडून आलेल्या खासदार-आमदाराची झाली आहे. क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने केलेल्या शिफारशीची थंडावलेली अंमलबजावणी, अण्णा भाऊ साठे आणि लहूजी साळवे यांच्या राष्ट्रीय स्मारकाचे रखडलेले काम, आरक्षणाच्या उप वर्गीकरणासाठी राज्यसरकारने घ्यावयाचा पुढाकार आणि अण्णा भाऊ साठे महामंडळाची झालेली आर्थिक दुरावस्था आदि प्रश्नांवर मातंग समुदायाची अलिकडच्या कालखंडात झालेली कोंडी संसदीय राजकारणाच्या गर्तेत अडकलेले मातंगांचे लोकप्रतिनिधी फोडण्यासाठी आपले आत्मिक बळ एकवटू शकले नाहीत.

**संदर्भ**

१. डॉ.रा.का.क्षीरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास पब्लिकेशन्स,औरंगाबाद,पृष्ठ. ५७
२. Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches Vol.18 Part-1 Page 545
३. य.दि.फडके, आंबेडकरी चळवळ , श्रीविद्या प्रकाशन, पुणे,तृतीय आवृत्ती, २००७,पृष्ठ.९१
४. य.दि.फडके, पुरोक्त, पृष्ठ .९८
५. धनंजय कीर, डॉ,बाबासाहेब आंबेडकर,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,चौथी आवृत्ती,२००६,पृष्ठ.३२२
६. Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches Vol.18 Part-2 Page.11-21
७. जयदेव गायकवाड, जातीभेदाचे अंत:प्रवाह,पद्मगंधा प्रकाशन,पुणे,२००७ पृष्ठ.११६
८. कित्ता,पृष्ठ.११७
९. प्रा.लक्ष्मण कोंडीबा ढोबळे यांनी दि.९/१२/२०१२ रोजी दिलेल्या अनावृत पत्रास ॲड.एकनाथ आवाड यांनी दि.१३/०३/२०१३ रोजी दिलेले उत्तर
१०. डॉ.रा.का.क्षीरसागर, पुरोक्त,पृष्ठ. १३१
११. बाबासाहेब गोपले, दलित मातंग समाज चळवळ, प्रकाशक,कुसुमताई गोपले,प्रथम आवृत्ती,२००८ पृष्ठ.२४ ते २९
१२. सुहास पळशीकर, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन, सप्टेंबर,१९९८ पृष्ठ .३७
१३. जयदेव गायकवाड, पुरोक्त,पृष्ठ.१३५
१४. बिरमल/ घोटाळे-मतदार संघ दलितांचे, राजकारण प्रस्थापित जातींचे, अभय कांता आणि इतर संपादक, रिपब्लीकनांची हाराकारी,सुगावा प्रकाशन, सप्टेंबर,२००१ पृष्ठ .१०६
१५. कित्ता पृष्ठ.१०७